# पृथ्वीचे रक्षण करणे समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी : प्रा.आर.बी. भास्कर



पर्यावरणातील व भौगोलिक घटकातील होणारे बदल तसेच मानवी विकासासामुळे पृथ्वीचा होणारा ह्यास थांबवायचा असेल तर पृथ्वीचे रक्षण करणे समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे असे प्रतिपादन न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा.आर.बी. भास्कर यानी केले श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी -कोतोली, ता. पन्हाळा येथील भूगोल विभागामार्फत भूगोल दिनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी प्रा. भास्कर बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.बी.एन.रावण होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते पृथ्वीगोलाचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमास भूगोल विभाग प्रमुख श्री.बी.जी. पाटील, डॉ. श्रीमती बी.एस.शिंदे,श्री.एस.पी. कुंभार, श्री.ए.आर. महाजन, श्री. महादेव हांडे छायाचित्रकार स्वप्नील दिंडे सर्व शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. गितांजली पाटील, स्वागत कु. शैलजा कांबळे, पाहुण्यांची ओळख कु. तेजस्विनी पाटील तर आभार कु. प्रियांका चेचर हीने मानले. फोटो ओळ- श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये भूगोल दिनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा.आर.बी. भास्कर सोबत श्री.बी.जी. पाटील, डॉ.बी.एन.रावण, श्री.ए.आर.महाजन, श्री.एस.पी. कुंभार, डॉ. श्रीमती बी.एस. शिंदे व इतर